# गंगातीरी आणि ग्रांटाकाठी

**जयंत नारळीकर**

*मधुर मनोहर अतीव सुन्दर,*
*यह सर्वविद्या की राजधानी।*

*यह तीन लोकों से न्यारी काशी।*
*सुज्ञान धर्म और सत्यराशी।।*
*बसी है गंगा के रम्य तट पर,*
*यह सर्वविद्या की राजधानी।*

*मधुर मनोहर अतीव सुन्दर,*
*यह सर्वविद्या की राजधानी।*

*नये नही है ये ईट पत्थर।*
*है विश्वकर्मा का कार्य सुन्दर।।*
*रचे है विद्या के भव्य मन्दिर,*
*यह सर्वसृष्टि की राजधानी।*

**या** आहेत बनारस हिंदू विद्यापीठाच्या विद्यापीठगीतातील सुरुवातीच्या काही ओळी आणि हे गीत लिहिले आहे शान्तिस्वरूप भटनागर यांनी. डॉ.भटनागर हे याच विद्यापीठात प्राध्यापक होते, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे रसायनशास्त्रज्ञ होते, पण त्याचबरोबर हिंदी, उर्दू व इंग्रजी वाङ्मयावर त्यांचे विशेष प्रभुत्व होते.

या विद्यापीठाची स्थापना १९१६ साली पंडित मदनमोहन मालवीय यांनी केली. कायदेपंडित, शिक्षणतज्ज्ञ, समाजसुधारक, राजकीय मुत्सद्दी आणि द्रष्टा नेता अशी ओळख असणाऱ्या मालवीयजींनी काशी नरेशांकडून १३५० एकर जागा मिळवली; ॲनी बेझंट, रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी यांच्यासारख्यांचे सहकार्य मिळवले आणि या विद्यापीठाची स्थापना केली. स्थापनेच्या वेळी जगदीशचंद्र बोस, पी.सी.रे, सी.व्ही.रामन अशा अनेकांची व्याख्याने झाली. विद्यापीठाची उभारणी करताना मालवीयजींच्यासमोर प्राचीन भारतातील नालंदा व तक्षशीला आणि ब्रिटनमधील ऑक्सफर्ड व केंब्रीज या विद्यापीठांची उदाहरणे होती. प्राचीन व आधुनिक यांचा संगम बनारस हिंदू विद्यापीठात व्हावा असे त्यांना वाटत होते. बाराव्या शतकात स्थापन झालेली ऑक्सफर्ड व केंब्रीज ही दोनही विद्यापीठे नदीच्या काठावर वसलेली आहेत. आयसिस नदीच्या काठावर आहे ऑक्सफर्ड तर ग्रांटा नदीच्या काठावर आहे केंब्रीज. त्यामुळे गंगा नदीच्या काठावर ज्ञानगंगा वाहावी असे मालवीयजींना वाटले आणि म्हणूनच विद्यापीठगीतात 'बसी है गंगा के रम्य तट पर' असे वर्णन आले आहे.

काशीमध्ये गंगा नदीवर जवळपास शंभर घाट आहेत, त्यांतल्या एका घाटाजवळ विद्यापीठाची कोनशिला बसवली गेली; पण शिलान्यासानंतर लगेचच गंगामाईला पूर आल्याने आसपासची जमीन पाण्याखाली गेली. त्यामुळे गंगामाईला जरा दूर ठेवूनच विद्यापीठ बांधण्याचा दूरदृष्टीचा निर्णय घेण्यात आला. पण तेवढा फरक सोडला तर ऑक्सफर्ड व केंब्रीज विद्यापीठांप्रमाणे बनारस हिंदू विद्यापीठ उभारण्याचे स्वप्न मालवीयजींना त्यांच्या हयातीतच साकार करता आले. ऑक्सफर्ड विद्यापीठात ड्रीमिंग स्पायर्स असतात, तशी बनारस विद्यापीठात मंदिरांच्या शिखरांनी नटलेली होस्टेल्स व कॉलेजेस बांधण्यात आली. ऑक्सफर्ड व केंब्रीज विद्यापीठांत ओक आणि एल्म वृक्ष मोठ्या प्रमाणात आहेत, त्याप्रमाणे बनारस विद्यापीठाच्या आवारात आंबे आणि जांभुळ यांच्या वृक्षराजी वाढवण्यात आल्या. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे बनारस विद्यापीठात निर्माण केलेल्या बौद्धिक वातावरणामुळे मोठ्या पगाराचे आकर्षण न दाखवताही भारतभरातील विद्वानांचा आणि त्यापाठोपाठ हुशार विद्यार्थ्यांचा ओघ विद्यापीठाकडे सुरू झाला. परिणामी 'राष्ट्रीय' असे संबोधन न वापरताही बनारस विद्यापीठाला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आणि विद्यापीठाच्या नावात 'हिंदू' हा शब्द असूनही ते सर्व धर्मीयांचे झाले.

मालवीयजी, राजेमहाराजे व धनिक मंडळींना भेटून विद्यापीठासाठी पैसे गोळा करीत असत; पण त्याहून अधिक काळजीने व जबाबदारीने ते विद्वानांचा शोध घेऊन त्यांना बनारस विद्यापीठात आणण्याचा प्रयत्न करीत असत. त्यावेळी केंब्रीजमध्ये गणितात संशोधन करीत



असलेल्या रँग्लर विष्णुपंत नारळीकरांना (माझ्या वडिलांना) मुद्दाम भेटून बनारस विद्यापीठात मालवीयजींनी आणले. त्यामुळे अशा या विद्येच्या वातावरणात माझ्या जीवनातील प्रारंभीचा काही काळ मला घालवता आला.

मालवीयजींच्या नंतर सर्वपल्ली राधाकृष्णन् बनारस विद्यापीठाचे कुलगुरु झाले. (पुढे ते भारताचे राष्ट्रपती झाले आणि आता आपण त्यांचा जन्मदिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करतो) राधाकृष्णन यांनी कुलगुरु असताना विद्यापीठातील बौद्धिक उत्कृष्टता आणि वैचारिक स्वातंत्र्य वाढत राहील यांसाठी प्रयत्न चालूच ठेवले. त्यावेळी विद्यापीठाला सरकारी अनुदान नव्हते, खाजगी देणग्यांवर ते चालवले जात असे. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा ते अड्डा बनले होते, त्यामुळे ब्रिटिश सरकारची तर वक्रदृष्टी होतीच. १९४२ च्या 'चले जाव' चळवळीच्या काळात बनारस विद्यापीठात चौकशीसाठी पोलिस पाठवण्याचा ब्रिटिश सरकारचा इरादा लक्षात आल्यावर वैचारिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी राधाकृष्णननी त्याला कसून विरोध केला. प्रगाढ विद्वत्ता, उत्कृष्ट वक्तृत्व आणि भारदस्त व्यक्तिमत्त्व यांचा संयोग म्हणजे डॉ.राधाकृष्णन्. त्यांच्या पहिल्या दोन गुणांची ओळख तेव्हा माझ्यासारख्या शाळकरी मुलास होण्याची शक्यता नव्हतीच; पण त्यांच्या तिसऱ्या गुणाची म्हणजे भारदस्त व्यक्तिमत्त्वाची छाप मात्र माझ्यावर पडली.

लहान वयात प्रत्येक मुलासमोर आपल्या वडिलांचा आदर्श असतो, तसा तो माझ्यापुढेही होता. शिवाय, माझे वडील तर केंब्रीज विद्यापीठातून स्टार रँग्लर होऊन आले होते. त्यामुळे मला वाटले आपणही केंब्रीज गाजवून यावे. 'बाप से बेटा सवाई' निघावा अशी अपेक्षा प्रत्येक बाप करीत नसेल, पण सभोवतालचे लोक मात्र करतातच. अर्थातच तो बेट्यावर अन्याय असतो. सुदैवाने माझ्या वडिलांनी तसे दडपण माझ्यावर कधीच आणले नाही; पण मला गणित व विज्ञान या विषयांत रुची आहे, असे लक्षात आल्यावर त्यांनी मला योग्य ते मार्गदर्शन केले आणि मग बी.एस्सी. झाल्यावर मी गणिताच्या ट्रायपॉससाठी केंब्रीज विद्यापीठात प्रवेश मिळवला.

मी केंब्रीज विद्यापीठात गेलो, तेव्हा गणिताच्या ट्रायपॉसबद्दल खूप काही ऐकले. प्राध्यापक भराभर शिकवून जातात; स्वअभ्यास करायची तयारी नसेल तर खुशाल बुडू देतात; चमच्याने भरवून खाण्याची सवय असलेल्यांना हा विषय खूप कठीण जातो, वगैरे... सुरुवातीला जे ऐकले ते सर्व शेवटी खरे निघाले. योग्य बोध घेऊन ज्यांनी तयारी केली, ते यशस्वी झाले आणि 'आपण भारतातले फर्स्टक्लास फर्स्ट आहोत, त्यामुळे इथेही यशस्वी होऊ' अशा भ्रमात राहून निर्धास्त बनलेले विद्यार्थी मात्र हादरून गेले.

केंब्रीजमध्ये राहणे, खाणे, आजारपण व इतर बाबतीत ट्यूटर मदत करतो आणि लेक्चर्सव्यतिरिक्त आठवड्यातून एकदा एक-दोन सुपरवायझर्सना भेटून अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी त्यांची मदत घेण्याची पद्धत आहे. तो क्लास एक किंवा दोन विद्यार्थ्यांचाच असतो, त्यामुळे चांगला सुपरवायझर मिळाला तर फायदा होतो. माझ्या सुदैवाने कॉलेजमधले ट्यूटर आणि ट्रायपॉसकरिता सुपरवायझर मला चांगले लाभले.

१९५९ च्या फेब्रुवारीत एका स्कूटरचा धक्का लागून माझ्या पायाचे हाड मोडले. ऑपरेशन करून स्क्रू बसवण्यात

आला. (माझे ऑपरेशन करणारे प्रख्यात सर्जन बटलर यांचे बंधू आर.ए.रॅब बटलर हे ब्रिटनचे उपपंतप्रधान होते, हे मला नंतर कळले.) मांडीपासून तळपायापर्यंत प्लास्टर मिरवीत क्रचेस घेऊन, मी साडेचार महिने फिरत होतो. त्या काळात कॉलेजचे चॅपलेन रे श्रायडर यांनी माझी पुष्कळ काळजी घेतली. नर्सिंग होम सोडल्यावर हवापालटासाठी त्यांनी मला डेव्हनमध्ये ली ॲबे येथे काही दिवस ठेवले. तेथून मला घरी (केंब्रीजला) पोचवायला कॉलेजचे सेन्सर (प्रिन्सिपॉल) डॉ.ग्रेव्ह स्वत: कार घेऊन आले. मला पाय वळवता येत नसल्याने मागच्या सीटवर उशा लावून मला आरामात बसवून ते स्वत: ड्राईव्ह करत निघाले. तासभर ड्राईव्ह केल्यावर त्यांना एकदम आठवले.

'दोन आठवडे तू इथे होतास, तुझे सामान?'

'माझी सुटकेस मी कारच्या बूटजवळ आणून ठेवली होती', मी उत्तरलो.

'माय गॉड! आय फरगॉट अबाऊट इट!' मला नीट बसवण्याच्या आट्यापिट्यात सुटकेस गाडीत चढवायचीच राहिली होती. त्यांनी लगेच गाडी वळवली, तासाभराचा उलटा प्रवास करून परत आलो तर सुटकेस जागेवर जशीच्या तशी होती.

त्या ॲक्सीडेंटमुळे माझी लेक्चर्स बुडाली होती, पण मी नोट्स आणून तयारी केली होती. रँग्लरच्या परीक्षेचे वर्ष होते ते. त्यामुळे ट्यूटरने जेव्हा विचारले की, 'तुला परीक्षेला बसायचेच की ड्रॉप घ्यायचाय?' तेव्हा मी म्हणालो, 'परीक्षा द्यायचीय.' (त्याला मराठी येत असते तर म्हणालो असतो 'एका पायावर')

१९५९ मध्ये भारतीय क्रिकेट संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर आला होता. त्यामुळे एखादा दिवस तरी लंडनमधील लॉर्डस मैदानावर मॅच पाहावी असे मी ठरवले. त्यासाठी सेंट जॉन्स वुड ट्यूब स्टेशनवर येऊन स्टेडियमकडे निघालो. 'तिकिट कुठे मिळेल?' असे एका पोलिसाला विचारले, तर तो म्हणाला, 'तू भारतीय विद्यार्थी आहेस का?' मी होकारार्थी उत्तर दिले, तेव्हा त्याने खिशातून एक तिकीट काढून माझ्या हातात दिले. तो पोलिस म्हणाला, 'एका सद्‌गृहस्थाला आज मॅच पाहणे शक्य नव्हते, म्हणून त्याने हे तिकीट माझ्याजवळ दिले. कोणातरी भारतीय विद्यार्थ्याला दे असे त्यांनी सांगितले होते.'

मला अतिशय चांगल्या जागेवरून आणि फुकटात ती मॅच पाहता आली.

केंब्रीजच्या वास्तव्यातील असे अनेक चांगले अनुभव मला आजही स्मरणात आहेत. माझ्यासारख्या नवशिक्या विद्यार्थ्याला तिथे सर्वांत प्रकर्षाने जाणवलेली गोष्ट म्हणजे, जगात दर हेक्टरी बुद्धिमत्ता मोजायची ठरवली तर केंब्रीजचा नंबर सर्वांत वरच्या श्रेणीत असेल, पण तरीही तिथल्या विद्वानांमध्ये साधेपणा, सौजन्यशीलता व नम्रता कमालीची होती. उदा. पॉल डिरॅक हे भौतिकशास्त्रज्ञ सायकल चालवत यायचे, त्यांना १९३३ मध्ये नोबेल पारितोषिक मिळाले होते. कॉलेजच्या बोटीला 'बंप रेसेस' मध्ये मोठ्या उत्साहाने उत्तेजन देणारे जॉर्ज थॉम्पसन हेही भौतिकशास्त्रज्ञ होते आणि त्यांनाही नोबेल पारितोषिक मिळाले होते. हिमोग्लोबिनच्या रचनेसंबंधातील संशोधनासाठी १९६२ चे नोबेल एकत्र दिले गेले ते जॉर्ज केंड्रयू आणि मॅक्स पेरुट्झ हे जीव-रसायनशास्त्रज्ञ केंब्रीजमधील आर्ट थिएटरच्या रूफ गार्डन सेल्फ सर्व्हिस रेस्टॉरंटमध्ये जेवण करताना दिसायचे. भौतिकशास्त्रज्ञ आणि इंग्रजीतील नामवंत कादंबरीकार अशी दुहेरी ओळख असलेले सी.पी.स्नो आणि लीव्हिट्झ साहित्यिक वाद गाजवायचे. अर्थशास्त्रात ज्यांचे अतिशय मूलभूत योगदान आहे अशा अर्थशास्त्रज्ञ जोन रोबिन्सन सलवार-कमीजमध्ये सहज वावरताना दिसायच्या. 'अ पॅसेज टू इंडिया' हे पुस्तक लिहिणारे प्रख्यात ब्रिटीश लेखक इ. एम. फॉस्टर तर मला शेजारी म्हणून लाभले. अशी कितीतरी नावे, घ्यावी तेवढी थोडीच. न्यूटन, डार्विन, टेनिसन पाहिले असल्याने केंब्रीजला त्यात विशेष काही वाटत नसावे.

पण माझ्या आयुष्याची जडणघडण होत असतानाच्या काळात, गंगातीरी आणि ग्रांटाकाठी असलेल्या या बौद्धिक वातावरणाचा व तेथील विद्वानांच्या साधेपणाचा, सौजन्यशीलतेचा व नम्रतेचा परिणाम माझ्या मनावर विशेष झाला.

**जयंत नारळीकर**

jvn@iucca.ernet.in

आयुका, पोस्ट बॅग नं-४

पुणे विद्यापीठ, पुणे-७